# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/१०/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २१/१०/२०२४ रोजी चे १७/४५ वा. दरम्यान पो. स्टे. बुट्टीबोरी हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना अशोक लेलॅंड पिकअप वाहन क्र. **MH40/CM 8729** मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने बोरखेडी शिवार येथे नाकाबंदी दरम्यान अशोक ललॅंड पिकअप वाहनास थांबवून पाहणी केली असता **MH40/CM 8729** मध्ये ०५ गोवंश जनावरे बैल व ०१ गोवंश वासरू असे एकुण ०६ जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने चालक व वाहक यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातून अशोक लेलॅंड पिकअप वाहन क्र. **MH40/CM 8729** किंमती ३,५०,०००/—रु मध्ये ०६ गोवंशिय जनावरे किंमती ५३०००/—रु असे एकुण ४०३०००/—रु_चा माल जप्त करण्यात आला असून **MH40/CM 8729 चे चालक आरोपी नामे—१) राहुल अरून वानखेडे, वय २२ वर्ष रा. पंचशील नगर इसारानी नागपूर २) जुबेर यासीन शेख वय ३२ वर्ष, रा. नागपूर टेकानाका** यांचे विरूद्ध कलम ११ (१) ए, ११ (१) (डी), ११(१) ई, **प्राण्यांना कृरतेणे वागविण्यास प्रतिबंधक कायदा १९६० सहकलम** ५ ए, ९ ए महाराष्ट्र पशु सरंक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्री. दीपक अग्रवाल (भा.पो.से) पोस्टे बोरी येथील ठाणेदार पोनि प्रतापराव भोसले, सपोनि प्रशांत लभाने, सफौ विनोद जाधव, पोअं नितेश राठोड, पांडुरंग मुंडे यांनी केलेली आहे.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर